# सर्वेक्षण फॉर्मसंबंधी FAQ (Frequently Asked Questions)

१ प्रशिक्षण विषयाच्या प्रश्नात मला हवा असलेला विषय नाही, काय करावे?

दिलेल्या पर्यायांपैकी सर्वात शेवटचा "**Other**" हा पर्याय निवडावा व आपल्या विषयांची नोंद करावी.

याच पद्धतीने ज्या प्रश्नांसाठी "**Other**" पर्याय दिलेला असेल त्याचा वापर आपण आपल्याला अपेक्षित असलेली माहिती भरण्यासाठी करू शकता.


नोकरी किंवा उद्योग व्यवसाय करण्यासाठी कौशल्य लागते, आपण कोणते कौशल्य आत्मसात करण्यास इच्छुक आहात? *

- [ ] सामान्य प्रशिक्षण – बेसिक इंग्रजी, किमान संगणक कौशल्य, मार्केटिंग स्किल, communication स्किल, presentation स्किल इत्यादी
- [ ] व्यवसाय प्रशिक्षण – प्लंबिंग, एलेक्ट्रीफिकेशन, मोबाईल रिपेअरिंग, बांबूपासून वस्तू निर्मिती व विक्री, tvfridge रिपेअरिंग, बांधकाम व्यवसायाशी निगडित सेंटरिंग, कॉंक्रीट,वीट बांधकाम प्लास्टर इत्यादी
- [x] शेती व पूरक व्यवसाय – सेंद्रिय शेती, शेळी पालन, कुक्कुट पालन, भाजीपाला उत्पादन व विक्री, दुग्धजन्य पदार्थ उत्पादन व विक्री इत्यादी
- [ ] हंगामी उद्योग – केटरिंग, मंडप व सजावट, फळ प्रक्रिया उद्योग, गणेश मूर्ती निर्मिती व विक्री, राखी उत्पादन व विक्री, पत्रावळी व द्रोण उत्पादन व विक्री इत्यादी
- [x] Other: मशरूम शेती

२ एक व्यक्ती अनेक फॉर्म भरू शकतो का?

हो, आपण एक फॉर्म **Submit** केला की आपल्याला दिसणाऱ्या "**Submit another response**" लिंकवर क्लिक करून दुसरा फॉर्म भरू शकता, फक्त प्रत्येक फॉर्म हा वेगळ्या व्यक्तीचा असावा.


कोविड १९ संदर्भातील जन सर्वेक्षण

Submit another response

३ दिलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्याव्यतिरिक्त मला माझे मत व्यक्त करायचे आहे किंवा आणखी काही माहिती द्यायची आहे, कशी देऊ?

यासाठी दुसऱ्या पानावरील शेवटून दुसरा प्रश्न पाहावा, यात आपले म्हणणे मोजक्या शब्दात मांडता येईल.


वरील विषयासंदर्भात आपल्याला काही मत मांडायचे असल्यास थोडक्यात मांडावे *

Your answer

४ मी भरलेला फॉर्म तुम्हाला मिळाला हे मला कसे समजेल?

फॉर्मच्या दुसऱ्या पानावरील “**Submit**” बटन क्लिक केल्यावर खालील पान दिसले तर समजावे फॉर्म पोचला.




५ फॉर्म भरत असताना इंटरनेट खंडित झाल्यास फॉर्म परत भरावा लागेल का?

आपण भरत असलेल्या फॉर्ममधील माहिती “**Save**” करण्याची कोणतीही सोय यात उपलब्ध नसल्याने ज्या ठिकाणी इंटरनेट कनेक्टीविटी चांगली आहे त्याच ठिकाणी फॉर्म भरावा.

६ ज्यांच्याकडे स्मार्टफोन नाही किंवा ज्यांना हा फॉर्म भरणे शक्य नसेल त्यांच्यासाठी काय करावे?

अशा व्यक्तींची फोनवर माहिती घेऊन त्यांच्या वतीने अन्य कोणीतरी जाणकार व्यक्तीने हा फॉर्म भरावा.

७ मला हा फॉर्म भरताना काही अडचण आल्यास किंवा प्रश्न विचारायचा असल्यास कोणाला संपर्क करावा?

ज्या संस्थेच्या माध्यमातून हा फॉर्म आपल्यापर्यंत पोचला आहे त्या संस्थेच्या अधिकृत व्यक्तीशी आपण संपर्क करावा.

८ मी दिलेल्या माहितीचा गैरवापर तर होणार नाही ना?

कोरोना संकटकाळात समाजात नेमकी काय परिस्थिती आहे, विविध समाज घटक कसा विचार करत आहेत याचा संपूर्ण महाराष्ट्रातील कल जाणून घेण्यासाठी हा सर्वे आहे, हे केवळ सामाजिक सर्वेक्षण असल्याने आपण दिलेल्या सत्य माहितीचा कोणत्याही व्यावसायिक कामासाठी गैरवापर होणार नाही.

९ हा फॉर्म कोणी भरणे अपेक्षित आहे?

हा फॉर्म **१८ ते ५०** या वयोगटातील **स्त्री वा पुरुष** जे खालील निकषात बसतात त्यांनी भरावा.

- शहरात ० ते ५ वर्षे काम करून गावात परत आलेले
- पहिल्यांदाच शहरात जाण्याच्या तयारीत असलेले
- मागील काही वर्षे गावात राहून शेती वा कोणताही उद्योग किंवा जवळपासच्या शहरात ये जा करून नोकरी / व्यवसाय करणारे
- शहरात आहे आणि शहरातच नोकरी / व्यवसाय करण्यास इच्छुक असणारे

१० हे सर्वेक्षण फक्त ग्रामीण भागापुरतेच मर्यादित आहे का?

नाही, हे सर्वेक्षण महाराष्ट्रातील ग्रामीण भागाबरोबरच शहरी भागातून, वनवासी तसेच अतिदुर्गम भागातूनही होणार आहे.

~~~~~ समाप्त ~~~~~
~~~~~